# योग्य माप

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

फार पूर्वीची गोष्ट आहे, दक्षिण-पूर्व चीनमधील हिरव्यागार डोंगर उतारांच्या मध्यभागी वसलेल्या वूयुआन नामक गावात एक मनुष्य राहात होता. त्याला आकडे खूपच प्रिय होते. कुठल्याही गोष्टीची किंमत ठरवणे जर त्याला शक्य झाले, तर त्याची काही ना काहीतरी किंमत तो नक्कीच ठरवत असे. कोणत्याही गोष्टीची काही खास परिमाण निश्चिती किंवा मोजणी करणे शक्य असल्यास तो ती आपल्या अलंकारिक भाषेत जरूर करत असे. आकड्यांमुळे जी स्पष्टता, सुलभता, सुरक्षितता अनुभवास येत असे, ती त्याला प्रिय होती. आकड्यांनी सुरक्षित असलेली, निरनिराळ्या विभागांमध्ये विभाजित केलेली अशी त्याच्या दुनियेची बांधणी होती. त्यात सुव्यवस्थितपणा होता. अतिशय अर्थपूर्ण होती त्याची दुनिया.

तर, ती एक संध्याकाळ होती जेव्हा तो माणूस हातात कागदांचा एक गठ्ठा घेऊन आपल्या झोपडीत पाय पसरून बसला होता. त्याच्या पाऊलाचा आकार तो कागदावर काढत होता.

त्याने त्याची मान एका बाजूला झुकवली आणि डोळे तिरके करून अतिशय एकाग्रतेने पाहिले. ओठांनी दाबून ठेवलेली त्याची जीभ त्याच्या तोंडाच्या एका कडेने सारखी बाहेर येत होती. अतिशय सावकाशपणे त्याने आपल्या टाचेच्या सभोवताली लेखणी फिरवली. मग थोडे थांबून मान दुसऱ्या दिशेला झुकवली, आपल्या पायाच्या बोटांच्या वक्राकार भागातून त्याने आपली लेखणी फिरवत बोटांचाही आकार काढला. खरेतर, या महाशयांना नवीन बुट बनवायचे होते आणि त्याचा आग्रह असा होता की, ते बुट त्याच्या पावलांमध्ये अगदी तंतोतंत बसायलाच हवेत.

आपल्या पायाची रेखाकृती अगदी बिनचूकपणे काढली गेली आहे याची खातरजमा झाल्यावर, त्याने आपल्या पायाखालील कागद हळूच काढून घेतला आणि काढलेल्या त्या रेखाकृतीचे मोजमाप करायला सुरुवात केली. त्याच्या पायाच्या अंगठ्यापासून टाचेपर्यंतचे माप ठीक 'इतके' लांब आणि ठीक 'इतके' रूंद होते. त्या माणसाने आपल्या तळव्याच्या प्रत्येक कोनाचे आणि वक्राकार भागाचे मोजमाप अनेकदा तपासून पाहिले आणि मग त्याने याच पद्धतीने दुसऱ्या पायाचे माप घेतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, सूर्य डोंगर रांगांच्या मागून उदित होत असतानाच तो बाजारात जायला निघाला. तो चालत जाणार होता. तिथपर्यंतच्या प्रवासाला अनेक तास लागणार होते — सर्वात जवळ असलेले खेडेगावही बऱ्याच अंतरावर होते. वळणावळणांच्या, धुळीने माखलेल्या मार्गांना ओलांडत आणि पिवळ्याधमक फूलांच्या किनारींनी सजलेल्या पर्वतउतारावरील शेतांना पार करीत तो चालत जात होता. हळूहळू उन्हाची तीव्रता वाढत चालली होती . . . सूर्य डोक्यावर आला होता. त्याला जराशी धाप लागली होती.

अखेर तो बाजाराच्या जागी पोहोचला. तिथे लोकांची मोठी गर्दी उडाली होती. दुकानदार अन्नपदार्थ आणि रेशमी कपड्यांपासून ते तांब्याच्या भांड्यांपयत्त, सर्व वस्तूंची विक्री करत होते आणि गिऱ्हाईके त्यांना वस्तू रास्त दरात मिळाव्यात यासाठी त्यांच्याशी घासाघीस करत होती. दूरवरूनच त्याला पादत्राणे बनविणाऱ्याचे दुकान दिसले.

कंबरेला बांधलेल्या आपल्या पिशवीला घट्ट पकडून ठेवत, तो गर्दीतून ढकलाढकली करत मार्ग काढत जात होता. त्याने आणलेल्या सामानाच्या एकत्रित सरमिसळीतच कुठेतरी सांदीकोपऱ्यात त्याचे ते कागद, पायाची ती मोजमापे होती. त्याने पिशवीत उचकापाचक करून शोध घेतला. घरून आणलेल्या जेवणाच्या डब्याचा त्याच्या हाताला लागला, त्यानंतर त्याच्या हाताला काहीतरी लांबट अशी वस्तू लागली, जी बहुधा पिण्याच्या पाण्याची बाटली होती. आनंदाने गुणगुणत, पिशवीत कशाचा तरी शोध घेत तो चालत होता.

काही वेळानंतर तो स्वत:शीच बडबडला, “हे काहीतरी चमत्कारिकच आहे!” “सापडतच नाही,” उतावीळपणे चरफडत त्याने पिशवीच्या अंतर्भागाचा पुन्हा एकदा शोध घेतला. मग तो आपल्या स्वतःच्या अंगावर सर्व ठिकाणी थोपटून चाचपडून पाहू लागला — आपल्या छातीवर, मांड्यांवर, एवढेच नव्हे तर आपल्या पाठीवरही. कदाचित कुठेतरी एखादा चोरखिसा असेल, ज्यामध्ये त्याने ती मोजमापे असलेले आपले किंमती कागद अनावधानाने असेच दुमडून ठेवले असतील.

पण तिथे तर खिसाही नव्हता आणि कागदही नव्हते. तो रस्त्याच्या मधोमध जागच्या जागीच थबकला आणि कागद हरवल्याची एक कडवट वस्तुस्थिती त्याच्या लक्षात आली. तो सुन्न झाला. आपल्या सभोवती गोंगाट आणि धक्काबुक्की करत असणाऱ्या गर्दीकडे शून्य नजरेने पाहत राहिला.

अखेरीस, त्याने हताश झाल्यागत एक दीर्घ सुस्कारा सोडला. जणूकाही त्याच्या शरीरातला सगळा जोशच विरून गेला होता. आता काय करावे? त्याला ते नवीन बुट तर हवेच होते. आणि ते पायात

नेमके मापातच बसायलाही हवे होते. एकच पर्याय होता. . . त्याला ते कागद घ्यायला परत जावेच लागणार होते.

म्हणून आपल्या थकलेल्या शरीराला जितक्या वेगाने चालवत नेता येईल, तितक्या वेगाने तो घराकडे परत निघाला. गावांचे ते निसर्गसौंदर्य त्याच्या डोळ्यांना दिसतच नव्हते. तो पुन्हापुन्हा स्वतःला दोष देत चालत जात होता. त्याला हेच कळत नव्हते की, तो इतका बेपर्वा कसा राहिला, अशी मूर्खतापूर्ण चूक त्याने केलीच कशी? त्याची ती मोजमापे तो विसरलाच कसा, जी अचूक येण्यासाठी त्याने इतका वेळ त्यावर खर्च केला होता?

शेवटी घरी पोहोचल्यावर त्याने जेव्हा पुढचे दार उघडले, तेव्हा त्याला ते कागद खोलीत तिथेच आढळून आले जिथे तो ते सोडून गेला होता. चिडचिड झाल्यामुळे तणतणतच त्याने त्यांच्यावर झडप घातली. होय, त्याच्या मनाला थोडीशी सुटकेची भावनादेखील जाणवत होती. आणि मग पुन्हा तो त्या खेड्याच्या दिशेने लांबलचक अशा परतीच्या प्रवासाला निघाला.

तो बाजाराच्या जागी जेव्हा पोहोचला, तेव्हा जवळजवळ सूर्यास्त झाला होता. त्याने वर पाहायचा विचार जर केला असता, तर कदाचित त्याला दिसले असते की, तिन्हीसांजेच्या धुसर आकाशात तारकापुंज चमकू लागले आहेत आणि संपूर्ण आसमंत धूसर जांभळ्या प्रकाशाने वेढला गेला आहे. पण आता त्याच्या नजरेला दिसत होती ती फक्त कमी होत जाणारी गर्दी, मोकळे होत जाणारे रस्ते आणि सामानाची आवराआवरी करणारे दुकानदार.

तो पादत्राणे बनविणाऱ्याच्या दुकानाकडे चालत जाऊ लागला. त्याचा ऊर अजुनही धपापत होता, त्याचे कपाळ घामाने चकाकत होते. तो दुकानाच्या जवळ येताच त्याला दिसले की, दुकानाचे दार बंद आहे. एक तरूण मुलगा — जो दिसण्यावरून तरी शिकाऊ कारागीर वाटत होता — दुकानाच्या पायऱ्या झाडत होता.

त्या माणसाने अजीजीने म्हटले, “मला आजच बुट खरेदी करायचे आहेत. दुकानदार आत आहेत का?”

तो युवक झाडत असताना थबकला आणि त्या माणसाकडे पाहत म्हणाला, “माफ करा महाशय, पण दुकान बंद झाले आहे. दुकानदार दादा घरी निघून गेले आहेत. तुम्हाला पुन्हा कधीतरी यावे लागेल.”

“काय . . .!” त्या माणसाने डोळे विस्फारत त्या युवकाकडे पाहिले आणि मग तो काहीसा अडखळत म्हणाला, “पण. . .पण. . . तुला माहिती नाही माझ्यासोबत आज कायकाय घडले आहे!” आणि मग त्याने आपली मोजमापाच्या कागदाची संपूर्ण रामकथा विस्तृतपणे सांगायला सुरुवात केली, की ती

मोजमापे कशी खास आहेत, तो मोजमापांचा कागद कसा घरीच राहिला आणि मग कसे त्याला माघारी जाऊन तो आणावा लागला. इत्यादी, इत्यादी.

युवक त्याच्याकडे टक लावून पाहत राहिला. सुरवातीला काहीसे अचंबितपणे, पण त्यानंतर मात्र त्याच्या चेहऱ्यावर कणव उमटली. त्या माणसाने त्याची कथा सांगणे जेव्हा संपवले, तेव्हा तो म्हणाला, “पण महाशय, भलेही तुम्ही तुमच्या पायाची मोजमापे घरी विसरला होतात, पण तुमचे पाय तर पूर्ण वेळ तुमच्याबरोबरच नव्हते का?”

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

ही कथा इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात लिहिलेल्या एका प्राचीन चीनी नीतिकथेवर आधारित आहे.